# प्रकरण दुसरे

## लिगाड आणि खांदेपाल्टमधील आशयसूत्रे

## प्रकरण दुसरे

## लिगाड आणि खांदेपालट मधील आशयसूत्रे

### प्रास्ताविक :

कादंबरीत कादंबरीकार आपला जीवनविषयक दृष्टीकोण मांडत असतो. वास्तव जीवनाचा आभास कादंबरीच्या कथानकात निर्माण करण्याचा प्रयत्न लेखक करीत असतो. त्यामुळे कादंबरीला वास्तवता प्राप्त झालेली असते. कादंबरीत वास्तवता येण्यासाठी कादंबरीचे आशयसूत्र महत्त्वाचे असते. हे आशयसूत्र लेखकाच्या जीवनविषयक दृष्टीकोणातून साकार झालेले असते.

कादंबरी वाङ्‌मयप्रकारात लेखकाची जीवनदृष्टी महत्त्वाची असते. याबाबत डॉ. बांदिवडेकर म्हणतात की, "जीवनदृष्टीच्या व्यापकतेवर, सखोल-पणावर आणि मौलिकतेवर लेखकाची महत्ता अवलंबून असते."[१] लेखकाची जीवन-दृष्टी समृध्द बनन्यासाठी तो मानवी जीवनाचे सूक्ष्म निरिक्षण करीत असतो. जीवन व्यापाराचे त्याचे आकलन महत्त्वाचे असते. लेखकाच्या जन्मजात प्रतिभेची झेप आणि त्याची व्युत्पन्नता व अभ्यास यानी जीवनदृष्टी समृध्द बनत असते.

कादंबरीत विविध व्यक्तिरेखा चित्रित होत असतात. त्यातील काही व्यक्तिंच्याद्वारे लेखक जीवनाचे आपले निरिक्षण व आकलन मांडत असतो. व्यक्तित्वाच्या निर्मितीत लेखकाचे जीवनदृष्टी मांडणारे एक व्यक्तित्व असते. त्याबरोबरच त्याची जीवनदृष्टी प्रतिकात्मरुपाने प्रतीत होत असते. याबाबत डॉ. बांदिवडेकर म्हणतात की, "ही जीवनदृष्टी जितकी भरीव व प्रतिकात्मता जितकी अर्थसमृध्द तितकी ती कलाकृती महानतेचे लेणे घेऊन येते."[२]

कलाकृतीच्या महानतेत कलाकृतीचे सर्व घटक कार्यरत असतात. "घटना, प्रसंग आणि व्यक्ती हे घटक परस्पराशी अतूट असा संबंध प्रस्थापित करुनच कथासूत्राला अपरिहार्यपणे पुढे पुढे खेचित असतात. म्हणजे कादंबरीच्या त्या

घटकामध्ये असा विकास घडवून आणण्याचे सामर्थ्य असावे लागते."[3] असे मत डॉ. बांदिवडेकर यांनी मांडले आहे.

मोहन पाटील यांच्या लेखनाची वैशिष्ठये सिध्द करण्यासाठी त्यांच्या "लिगाड" आणि "खांदेपालट" या लघुकादंबऱ्यातील आशयसूत्राचा अभ्यास करावयाचा आहे. त्यांच्या कादंबऱ्यातील आशयसूत्राचा अभ्यास करताना काही वेगळी वैशिष्ठये जाणवतात. लेखकाच्या लेखनातून प्रतीत होणारी जीवनदृष्टी ही त्यांच्या आशयसूत्रातून अविष्कृत होत असते. लेखकाचा हा जीवनविषयक दृष्टिकोण त्यांच्या कादंबरीच्या आशयसूत्रात व्यक्त झालेला आहे. या आशयसूत्र निवडीपासूनच लेखकाचे वेगळेपण सिध्द होत असते.

[ मोहन पाटील हे स्वतंत्र जाणीव आणि भूमिका असणारे लेखक आहेत. त्यांचा ग्रामीण जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोण स्वतंत्र आहे. रुढ ग्रामीण साहित्यापेक्षा पाटील यांच्या साहित्यातून व्यक्त झालेल्या जाणिवा भिन्न असल्याचे सकृतदर्शनी जाणवते. पाटील यांच्या कादंबऱ्यातून बदलत्या ग्रामीण जीवनाचे चित्रण झालेले आढळते. या बदलत्या ग्रामीण जीवनात मानवी स्वभावाचे विविध नमूने वृत्ती-प्रवृत्ती, मानसिक ताण-तणाव, जगण्यातील कोंडमारा यांचे सूक्ष्म चित्रण झालेले दिसते.]

"लिंगाड" आणि खांदेपालट" या दोन लघुकादंबऱ्यांचा अभ्यास आपल्याला येथे करावयाचा आहे. हा अभ्यास करीत असताना आशयसूत्राबरोबर येणारी विविध उपआशयसूत्रे ध्यानात घेऊन त्यांचे अभ्यासाच्या सोयीसाठी वर्गीकरण केले आहे. प्रथम आपण "लिंगाड" कादंबरीतील आशयसूत्राचे स्वरुप समजावून घेऊया.

१. <u>लिगाड कादंबरीतील आशयसूत्राचे वर्गीकरण :</u>

"लिगाड" कादंबरीत "बदलते ग्रामीण वास्तव" हे मूख्य आशयसूत्र

आले आहे. बदलत्या ग्रामीण जीवनाची वास्तवता साकार करण्यासाठी या कादंबरीत अनेक उपआशयसूत्रे आली आहेत. "लिगाड" कादंबरीत खालील उपआशयसूत्रे आली आहेत.

१) बदलते शेतीचे स्वरूप
२) ग्रामीण जीवनातील समस्या
३) ग्रामीण माणूस
४) निसर्गचित्रण

ही उपआशयसूत्रे "लिगाड" कादंबरीत ठळकपणे जाणवतात. या सर्व उपआशयसूत्रातून एक प्रमुख आशयसूत्र तयार झालेले दिसते. हे प्रमुख आशयसूत्र म्हणजे "बदलते ग्रामीण वास्तव" या कादंबरीत आलेली उपआशयसूत्रे मूख्य आशयसूत्राला भरीवपण आणून देत असल्याचे दिसते. या आशयसूत्रामुळे कादंबरीला बांधेसूदपणा आलेला आहे.

लिगाड कादंबरीतील आशयसूत्रे :

"लिगाड" कादंबरीत "बदलते ग्रामीण वास्तव" हे प्रमुख आशयसूत्र आहे. या आशयसूत्राचे स्वरूप समजावून घेत असताना प्राचीन काळात ग्रामीण जीवन कसे होते हे समजावून घेणे गरजेचे वाटते. म्हणून प्रथम प्राचीन भारतातील खेडयांचे जीवन कसे होते याचा आढावा घेतला आहे.

२. प्राचीन भारतातील ग्रामीण जीवन :

भारत हा शेतीप्रधान देश आहे. प्राचीन काळापासून भारतातील खेडयांची रचना स्वयंपूर्ण होती. ग्रामीण भागातील लोकजीवन साचेबंद होते. गावातील सत्तेचे केंद्रस्थान गावचा पाटील होता. सवर्ण आणि बारा बलुतेदार अशा स्वरूपात ग्रामीण समाजजीवन विभागलेले होते. परंतु सर्वांचे जीवन परस्पराशी निगडीत होते.

खेड्यात शेती हा प्रमुख व्यवसाय होता. शेती हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा होता. त्यामुळे सर्वांचे जीवन शेतीवर अवलंबून होते. शेती पारंपरिक पध्दतीने केली जात होती. विहिर, मोटेने पाणी उपसणे, बैलाकडून जमिनीची मशागत करणे, ठराविक अन्नधान्याची पिके घेणे. अशा प्रकारे निसर्गाशी समायोजन साधीत ग्रामीण जीवन साकार झाले होते.

ग्रामीण भागातील जीवन जरी स्वयंपूर्ण असले तरी सामान्य माणसांच्या जीवनात अनेक समस्या होत्या. प्राचीन काळातील शेतकऱ्यांचे जीवन चित्रित करताना त्रिंबक आत्रे म्हणतात की, "एक बळी हजार छळी अशी कुणाब्यांची आवस्था होती."[४] शेतकरी वर्षभर कष्ट करून उत्पन्न काढीत असे. त्याची गावच्या पाटलाकडून सतत पिळवणूक होत असे. तसेच सरकारी वसूल, बारा बलुतेदार, फिरस्ते यांच्यापासून शेतकऱ्यांना सतत उपद्रव होत होता. शिवाय काही वेळा निसर्गाची अवकृपा होत असे. त्यावेळी शेतीला पाणी मिळत नसे. शेतकऱ्यांची पिके जळून जात. त्यामुळे शेतकरी सतत कर्जबाजारी होत होता.

ग्रामीण भागातील दलितांच्या जगण्यात यापेक्षाही विदारक दु:खे होती. गावगाड्यात हा समाज गावकुसवाबाहेर जीवन जगत होता. दु:ख, दारिद्र्य, अज्ञान, भूक, या समस्याना तोंड देत जगण्याची धडपड दलितवर्ग करीत होता. जगण्यासाठी याना सवर्णांवरच अवलंबून राहावे लागत असे. दलित समाज खेड्यात सतत उपेक्षित जीवन जगत आला होता.

ग्रामीण भागात स्त्रियांचे जीवन करूणाजनक होते. शिक्षणापासून वंचित असलेल्या स्त्रियांच्या वाटयाला "चूल आणि मूल" एवढेच होते. आयुष्यभर पुरुषाची केवळ भोग्यवस्तू म्हणून राहणे यापलिकडे स्त्रियांना फारसे महत्व नव्हते. यापेक्षाही विधवा, परित्यक्ता यांचे जीवन हलाकीचे होते असे

दिसते. विधवा, परित्यक्ता, निराधार स्त्रिया या गावची भोगलालसेची मालमत्ता समजली जात असे.

ग्रामीण भागात सामान्य माणूस सतत नागवला जात होता. शेत-मजूर, भूमिहीन, फिरस्ते लोक यांच्या जगण्याला काही अस्तित्व नव्हते. पोटा-साठी आयुष्यभर कष्ट करणे एवढेच त्यांच्या जीवनाचे ध्येय होते. जीवनात गुलामाप्रमाणे काम करावे लागत होते. भूक, दारिद्र्य, उपासमार त्यांना सतत सहन करावी लागत होती. सामान्य माणसाचे जीवन असे दुबळे होते. प्राचीन भारतातील ग्रामीण जीवन अशा स्वरूपाचे होते.

## ३. बदलते ग्रामीण जीवन :

१९२० ते १९२५ च्या कालखंडात महात्मागांधी यांनी "ग्रामोध्दार" चळवळ सुरु केली. "खेड्याकडे चला" खरा भारत खेडयात आहे असे सांगून गांधी यांनी शहरी समाजाला खेड्याच्या महत्वपूर्णतेची जाणीव करुन दिली. त्या-मुळे ग्रामीण विकासाला चालना मिळाली. स्वातंत्र्यानंतर खेडयात बदल होऊ लागला. खेडयात राजकीय चळवळीच्या माध्यमातून विविध गोष्टी आल्या. परंपरागत प्रथेप्रमाणे पाटील हा गावचा प्रमुख होता. खेडयात ग्रामपंचायत स्थापन झाली. निवडणूक प्रक्रियेमुळे खेडयातील सत्ताप्रमुखाचे स्थान बदलले. पाटलाची जागा सहकारातील प्रमुखाकडे आली.

ग्रामीण भागातील सत्तास्थान बदलल्यामुळे ग्रामीण जीवनातील बल-स्थानही बदलले. लोकशाहीत या नव्या राजकारणामुळे मानवी जीवनात नवे संघर्ष उभे राहिले. लोकशाहीत सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा यांच्या कल्पना बदलत गेल्या. ज्याना या गोष्टी मिळविता आल्या त्यांनी ग्रामीण

जीवनावर वर्चस्व प्रस्थापित केले. या सत्ताप्रमुखानी ग्रामीण जीवन आपल्या अधिकाराखाली ठेवण्याचा प्रयत्न सुरु केला.

गावचा प्रमुख सत्तेच्या जोरावर गावाची पिळवणूक करु लागला. आपले सत्तास्थान टिकविण्यासाठी विविध डावपेच तो लढवू लागला. या डावपेचामध्ये कधी यश तर कधी अपयश त्याच्या पदरी येऊ लागले. या यशापयशातून जाताना त्याच्या मानसिकतेत अपरिहार्यपणे गुंतागुंत झाली.

लोकशाही प्रक्रियेमुळे सर्वांना राजकारणात सहभागी होण्याची संधी मिळाली. यामुळे खेडयात वैरत्व निर्माण झाले. गावात दुफळी निर्माण झाली. कुटुंबातील माणसात दुरावा निर्माण झाला. जातीजातीत नवे संघर्ष उभे राहिले. याचा परिणाम ग्रामीण जीवनावर होऊ लागला. स्वातंत्र्यानंतर शेती व्यवसायाचे स्वरुप बदलले. नदीवर मोठमोठी धरणे बांधली. इरिगेशन आले. वीज आली. पाटाचे पाणी शेतीला मिळू लागले. त्यामुळे ऊसाचे पिक वाढले. बैलाच्या ठिकाणी ट्रॅक्टर आला. मोटेने पाणी उपसण्याची परंपरा मागे पडली. त्याठिकाणी वीजपंप आले. आधुनिक बियाने आले. शेतकरी रासायनकि खताचा वापर करु लागला. आकाशवाणीवरील हवामान व पिकपाण्याचा अंदाज घेऊन शेतकरी आपल्या पिकाचे आराखडे बांधू लागला.

ऊसाच्या पिकाबरोबर शेतकरी फळांच्या बागा करु लागला. बोर, डाळिंब, पेरु, द्राक्षे, नारळ, चिकू, यांच्या बागा उभ्या राहिल्या. या बदलामुळे शेतक-यांच्या हातात पैसा खेळू लागला. शेतीचे उत्पादन वाढल्यामुळे शेतक-यांना भरपूर पैसे मिळू लागले. त्यामुळे तो पैसा खर्च करण्याचे नवे मार्ग ग्रामीण भागातील समाज शोधू लागला. हौशेसाठी मोटरसायकल घेणे, ऑलिशान हॉटेलात पार्टी झोडणे. शहरात जावून दौलत जादा करणे. लग्न समारंभात अमाप पैसा खर्च करणे. अशा विविध स्वरुपात ग्रामीण जीवन बदलत

गेले. असे वागणे म्हणजे आपली प्रतिष्ठा, मोठेपणा, श्रीमंती दाखविणे असे त्यांना वाटू लागले.

ग्रामीण जीवन पक्क्या रस्त्याने जोडले. दळणवळणाच्या साधना-मुळे खेडयाचा चेहरा बदलला. खेडयात उद्योगधंदे उभे राहिले. सहकारातून साखर कारखाना उभा राहिला. गावात सहकारी पाणी सोसायटी स्थापन झाली. सहकारी पतसंस्था निर्माण केली. सूतगिरणी झाली. दुधडेअरी आली. रेडिओ आला. दूरदर्शन आले. खेड्यात वर्तमानपत्र आले. या घटनामुळे ग्रामीण माणूस जगाच्या राजकारणाची चर्चा करु लागला. त्यावर आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करु लागला. अशा अनेक विकासाच्या योजना ग्रामीण जीवनात घडून आल्या. ग्रामीण मराठी खेडे सर्व अंगानी कसे बदलत गेले याचे चित्रण आनंद यादव यानी केलेले आहे. बदलत्या खेडयाचे चित्रण करताना ते सांगतात,

"देशाला स्वातंत्र्य मिळाले आणि ब्रिटिशानी खिळखिळया केलेल्या खेडयाला बदलण्याचा प्रयत्न सरकारने चालू केला. खेडी हा आपल्या राष्ट्राचा प्राण आहे हे आपल्या सरकारने प्रथमपासूनच ओळखले आहे. पंचवार्षिक योजनात खेडयांना आग्रक्रम मिळाला. खेडयातून धरणे, कालवे, पाटबंधारे, तलाव निर्माण झाले. समाजविकासाच्या योजना आल्या. पंचायती राज्य आले. या पंचा-यती राज्यामुळे खेडयात घराघरात राजकारण शिरले. खेडे - तालुका, जिल्हा-राज्यसरकार अशी साखळी निर्माण झाली. त्यामुळे खेडयातल्या गल्लीतली माणसे दिल्लीलाही कामासाठी जाऊ लागली. सहकारी चळवळीनी जिकडे तिकडे अनेक प्रकारच्या सोसायटया, मंडळे निर्माण झाली. कॅनाल, धरणे यांचे पाणी आले आणि साखरकारखाने निर्माण झाले. या साखरकारखा-न्यानी बागायतदाराना नवी समृध्दी दिली. आणि नवे अर्थकारण खेडया-पाडयात सुरु झाले."[५]

खेड्यातील या बदलामुळे नवे ताण नवे नाटय आणि नवी जीवनपध्दती घडू लागली. नागर संस्कृतीतील अनेक वस्तु खेड्यात आल्या. जीवनोपयोगी साधने खेड्यात आली. या ग्रामीण रूपांतरात खेड्यातील छोटा शेतकरी खेड्याचा गाभा असलेला मजूरवर्ग उपेक्षितच राहिला. त्याला सरकारी योजनाचे फायदे घेता आलेला दिसत नाही. शिक्षण घेऊ लागला. आपल्या मुलाना शिकऊ लागला. त्याचा परिणाम शेतीव्यवसायातील श्रध्दा कमी झाली. नोकरीच्या शोधात फिरू लागला. त्यातून सुशिक्षित बेकारी वाढलेली दिसते.

बदलत्या खेड्याचे फायदे, त्यांची फळे खेड्यातील वतनदार, जमीनदार, कार्यकर्ते, पुढारी, बागायतदार यानाच मिळालेले दिसतात. खेड्यात संख्येने जास्त असलेल्या छोटया शेतकऱ्यांच्या व मजूरांच्या नशिबी मात्र असलेले दारिद्र्य, उपासमार, उपेक्षा संपलेली दिसत नाही. सामान्य माणसांच्या वाटयाला नवे खेडे आलेले दिसत नाही. त्यांच्या वाटयाला नवे खेडे नवी दु:खे घेऊन आलेले जाणवते. जीवनातील नव्या संघर्षाला सामोरे जाऊ लागले. नेवे प्रश्न उभे राहिले. त्यातून सामान्य माणसाच्या जगण्यातली दुर्बलता जाणऊ लागली.

बदलत्या ग्रामीण जीवनात कुटुंबाचे विघटन होत असलेले दिसते. एकत्र कुटुंबपध्दती आज खेड्यात दिसत नाही. नोकरी निमित्ताने शहरात गेलेला मुलगा आपले कुटुंब तेथेच स्थिर करू लागला. भावाभावाच्या वाटण्या होऊन छोटी छोटी कुटुंबे निर्माण झाली. शिवाय घर जमिनीच्या वाटणीवरून घराघरात भांडणे होऊ लागली. त्याचा परिणाम पिढयानपिढयाचे वैर जोपासले जाऊ लागले. अशा कुटुंबात मुलावर संस्कार झालेले दिसत नाही. त्यामुळे ग्रामीण भागातील मुलांच्या जीवनाला भवितव्य राहिले नाही. उदासिनता, जीवनातील नैराश्य वाढत गेलेले चित्र दिसू लागले.

ग्रामीण भागातील बदलामुळे एकाच कुटुंबात दोन भिन्न विचारांच्या पिढया तयार होऊ लागल्या. घरातील जुनी पिढी पारंपरिक पध्दतीने वागू लागली. तर तरूणपिढी पुरोगामी विचाराने वागू लागली. त्यामुळे कुटुंबातले

माणूसपण हरवत गेलेले दिसते. मान, सन्मान, आदर या कल्पना जून्या झाल्या. सासू आणि सून यांचे नाते बदलत गेलेले दिसते. एकंदर कौटुंबिक जीवनात बरीच उलथापालथ झालेली जाणवते.

बदलत्या ग्रामीण जीवनात देवदेवता अंधश्रध्दा जत्राखेत्रा, भुतेखेते, यांच्यावरील विश्वास ढळत गेलेला दिसतो. शिक्षणाचा फार मोठा परिणाम ग्रामीण जीवनावर झालेला आहे. त्यामुळे जगण्याची नवी मूल्ये त्यांची स्वीकारलेली दिसतात. ग्रामीण भागातील या परिवर्तनामुळे नवीन गुंते तयार झाले. श्रमाचे महत्व कमी झाले. माणसातील माणूसपण हरवत चालले. कुटुंबातील नाती दुरावत चालली. शिक्षणाने माणसात पांढरपेशेपण तयार झाले. शिकलेला ग्रामीण तरुण दिशाहीन अवस्थेत भरकटू लागला. परंपरागत कमाईवर जगणे हेच त्यांच्या आयुष्याचे ध्येय बनले. त्याचा परिणाम तरुणांत व्यसनाधिनता वाढली.

याबरोबरच खेडयात नव्या समस्या जन्मास आल्या. शेतकऱ्यांच्या जीवनात अनेक संकटे उभी राहिली. पिकाला पाहिजे त्यावेळी पाटाचे पाणी मिळेना. पिकाला वेळेवर खत मिळेना, त्यामुळे पिके जळू लागली. शेतकऱ्यांची ही दयनीय अवस्था स्पष्ट करताना मोहन पाटील म्हणतात,

"ऐनवेळी खिंडीत आडवून पावसाने झोडपावे अशी शेतकऱ्यांची अवस्था झाली."[६]

शेतीच्या पाण्यासाठी शेतकऱ्यांना लाचारी पत्करावी लागली. सहकारी सोसायटीचा चेअरमन पाण्याचा वापर जास्त करु लागला. सहकाराचा फायदा सामान्य शेतकऱ्यांच्या पदरात फारसा पडला नाही. शेतीतील उत्पादन कर्जापोटी सोसायटीकडे जमा होऊ लागले. त्यामुळे कष्ट करुनही त्यांच्या पदरात काहीच पडत गेले नाही. त्याचा परिणाम ग्रामीण समाजात दोन ठळक

वर्ग तयार झाले. एक सत्ताप्रमुख व दुसरा शोषित समाज यामुळे शोषित समाजाच्या जीवनात उदासिनता, नैराश्य, वैफल्य, आले. त्यांचे आर्थिक व शारीरिक शोषण होऊ लागले.

गावातील बदलत्या राजकारणामुळे दलितांचे स्थान बदलले. त्यांना गावाच्या चौकटीत महत्व प्राप्त झाले. त्यांना राजकारणात संधी मिळाली. राजकारणामुळे त्यांच्यातही दोन स्तर निर्माण झाले. ज्याना राजकारणात संधी मिळाली त्यांनी सत्ताधारी लोकांच्याबरोबर राहून स्वत:चा फायदा करून घेतला. उरलेला दलित समाज उपेक्षित राहिला. विकासाच्या प्रक्रिया त्यांच्यापर्यंत पोहचल्या नाहीत. त्यामुळे त्यांच्या जीवनात फारसा बदल झाला नाही. भूमिहीन शेतमजूरांची परिस्थिती केविलवाणी झाली. बदलत्या ग्रामीण विकासाचे वारे यांच्यापर्यंत पोहचले नाही. जगण्यासाठी रात्रंदिवस कष्ट करणे, गुलामाप्रमाणे राबणे असे दुबळे जीवन सामान्य माणूस जगू लागला.

ग्रामीण जीवनाचे स्वरूप पाहत असताना स्त्रियांच्या जीवनात फारसा बदल झालेला जाणवत नाही. स्त्रियांना शिक्षण मिळाले. परंतु शिक्षणाचा फायदा फारच थोडया स्त्रियांना मिळाला. खेडयातील परंपरागत रूढी, अंधश्रध्दा यानी स्त्रियांचे जीवन जखडून ठेवले. ग्रामीण भागात स्त्रीपुरुष समानतेचा विचार रूजला नाही. यापेक्षाही ग्रामीण भागातील विधवा परित्यक्ता दलित स्त्रियांची अवस्था दयनीय झाली. गावातील बागायतदारांच्या व सत्ताप्रमुखांच्या वासनेच्या शिकार होउ लागल्या. राजकारणातून स्त्रियांचे बळी जाऊ लागले. उदाहरणार्थ "लिगाड" कादंबरीतील शकूचा भाऊ बजरंग दाजीतात्यांना विरोध करतो. म्हणून तो विरोध मोडून काढण्यासाठी तात्या शकूवर बलात्कार करतात. तर "खांदेपालट" मधील धोंडीनाना लकुळयाची शिट आपल्या बाजूने येण्यासाठी राजीला विहिरीत टाकतात.

ग्रामीण भागातील या नव्या बदलामुळे तेथील निसर्गही बदलला. रूक्ष, ओसाड, माळरानावर ऊसाचे पिक उभे राहिले. फळांच्या बागा उभ्या राहिल्या. शासनाने "झाडे लावा, झाडे जगवा" हा नवा विचार समाजात आणला. ग्रामीण भागात वातावरण बदलले. पाटाचे पाणी, हिरवीगार शेती, फळांच्या बागा, नदीकाठी दाट झाडी यामुळे ग्रामीण भागाचे चित्र बदलले. याचा परिणाम निसर्गातील रूक्षपणा जाऊन त्याठिकाणी नवे चैतन्य निर्माण झाले. निसर्गातील या बदलामुळे ग्रामीण जीवनातही नवे चैतन्य निर्माण झाले.

बदलत्या ग्रामीण जीवनाचे चित्र पाहत असताना माणसांच्या जीवनात अनेक नव्या समस्या निर्माण झालेल्या जाणवतात. खेड्यात जो धूर्त होता. ज्याच्याजवळ बेरकीपणा होता अशा माणसांनी स्वत:चा फायदा करून घेतला. परंतु सामान्य माणसाच्या जीवनाची सतत परवड होत राहिली. गावातील अनेक विकास योजनांमुळे ग्रामीण जीवन बदलत गेले. त्यामुळे नव्या समस्या निर्माण झाल्या.

### ४. "लिंगाड" मधील ग्रामीण वास्तव :

"बदलते ग्रामीण वास्तव" हे "लिगाड" कादंबरीचे मुख्य आशयसूत्र आहे. हे आशयसूत्र जीवंत साकार करण्यासाठी लेखकाने वैशिष्टयपूर्ण चित्र रेखाटले आहे. कादंबरीतील घटना, प्रसंग आणि व्यक्तिचित्रण यांच्या माध्यमातून लेखकाने ग्रामीण आशय वास्तवतेने साकार केला आहे.

खेडेगावात पंचायती राज्य आल्यापासून ग्रामीण जीवनाला चालना मिळाल्याचे दिसते. स्वातंत्र्यानंतर लोकशाही राज्यप्रणालीत सर्वांना मत-दानाचा अधिकार मिळाला. त्यामुळे राजकारणात सहभागी होता आले.

त्याचा परिणाम ग्रामीण जीवनात परिवर्तन होऊ लागले. ग्रामीण विकासाच्या अनेक योजना खेड्यात आल्या. नदीवर धरणे बांधली. इरिगेशन झाले. पाटाचे पाणी शेतीला मिळू लागले. त्यामुळे ऊस बागायतीचे क्षेत्र वाढले. खेडयात साखरकारखाना उभारला. सहकाराचे जाळे विणले. ग्रामीण विकासाच्या अनेक योजनांचा परिणाम लोकजीवनावर होऊ लागला. त्यामुळे ग्रामीण भागातील सत्तेचे केंद्रस्थान बदलले. गावचे प्रमुखपद सहकारातील प्रमुखाकडे गेले. त्यामुळे ग्रामीण भागातील बलस्थानही त्याच्याकडे आले.

"लिगाड" कादंबरीत गावचे बलस्थान दाजीतात्या आहेत. दाजीतात्यांकडे सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा यांचे केंद्रिकरण झालेले आहे. सत्तेच्या जोरावर दाजीतात्या गावच्या लोकांची पिळवणूक करू लागला. राजकारणात विरोध करणाऱ्या माणसांना तो अडचणीत आणून त्याचे खच्चीकरण करू लागला. आपली सत्ता टिकविण्यासाठी गावात अनेक भानगडी करु लागले. विरोधीशेतकऱ्यांच्या ऊसाला वेळेवर पाणी मिळेना. नियमाप्रमाणे पाणी सोसायटी भरून देखील सामान्य शेतकरी अडचणीत येऊ लागला. सामान्य शेतकऱ्यांचे सतत शोषण होउ लागले.

गावातील सत्ताप्रमुख दाजीतात्यांनी आपले राजकीय आसन बळकट करण्यासाठी गावात दुफळी निर्माण केली. जाती जातीत भांडण लावले. भावाभावात कुटुंबात वैर निर्माण केले. त्याचा परिणाम गावातील लोकांचे जीवन अस्थिर झाले. दाजीतात्याला विरोध करण्याची हिंमत कोणाजवळ नसते. गावातील सर्वजन त्यांना घाबरत असत. अशा गावातील लोकांच्या जीवनातील समस्या जाणवू लागल्या.

ग्रामीण भागातील शेतीचे स्वरूप बदलले दिसते. शेतकरी मशागतीसाठी ट्रॅक्टरचा वापर करु लागला. नदीवर धरण बांधले. ऊसाची बागायती

वाढली. साखरकारखाना उभारला. यामुळे ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदललेला दिसतो. सहकाराचा फायदा गावातील सत्ताप्रमुख दाजीतात्या घेतो. पाटाचे पाणी स्वत:च्या विहिरीत सोडतो. सरकारी खत स्वत:च्या शेतीला वापरतो. इतर शेतकऱ्यांचा ऊस जळू लागतो. परंतु तात्यांचा मळा हिरवागार दिसतो. सामान्य शेतकऱ्यांची सतत कुचंबना होऊ लागली. सत्ताप्रमुखाच्या दबावाखाली सतत त्यांना जगावे लागते.

गावातील सत्ताप्रमुख दाजीतात्या आपली सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा जपण्यासाठी गावातील लोकाना सतत त्रास देऊ लागले. त्यामुळे सामान्य लोकांचे जीवन उद्ध्वस्त होऊ लागले. राजकीय पाठिंब्यासाठी दाजीतात्या अनेक डाव-पेच लढवू लागले. गावातील तरुण बजरंग तात्यांच्या वागण्याला विरोध कर-ण्याचा प्रयत्न करतो. बजरंगाचा विरोध मोडून काढण्यासाठी दाजीतात्या त्याची बहिण शाकूवर बलात्कार करतात. सहजपणे ही बाजू झटकून टाकतात. या प्रसंगामुळे बजरंगाचे कुटुंब उद्ध्वस्त होते. आपल्या वासनेची भूक भागविण्या-साठी दाजीतात्या लगमान्नाच्या बायकोबरोबर संबंध ठेवतात.

दाजीतात्याजवळ धूर्तपणा आहे. बेरकीपणा आहे. जगण्यातली मग्रुरी आहे. आपल्या जगण्यातला खोटेपणा लपवण्याचा सतत प्रयत्न करतो. दाजी-तात्याना गावात खरेपणाने जगता येत नाही. दाजीतात्यांना आपल्या मुलांवर चांगले संस्कार करता येत नाहीत. मुलावर चांगले संस्कार करण्याचा नैतिक अधि-कार त्यांना नसतो. त्यामुळे त्यांचे जीवन अस्थिर होते. त्यातच त्यांच्या जगण्याला दुभंगलेपण प्राप्त होते.

गावातील रघू, शिवा, बजरंग सारखी तरुण पिढी दाजीतात्याच्या मनमानी वागण्याला विरोध करतात. गावात दाजीतात्यांच्या विरोधात प्रचार करतात. लोकाना तात्यांच्या अनेक भानगडी सांगतात. परंतु गावातील

लोक याना पाठिंबा देत नाहीत. दाजीतात्या या तरूण मुलाना अडचणीत आणून त्यांचे खच्चीकरण करतात. दाजीतात्यांने जालिंदर कांबळेला ग्राम-पंचायतीत डेपुटी सरपंच केलेले असते. त्यामुळे सारा दलित समाज त्यांनी पाटी-शी घातलेला असतो. मराठा आणि जैन यांच्यात भांड्ण लावून आपला पाठिंबा भक्कम केलेला असतो. त्याचा परिणाम गावात पिढयानपिढयाचे वैर जोपासले जावू लागले.

"लिगाड"मध्ये आलेल्या स्त्रियांचे जीवन शोचनिय आहे. जन्मभर विधवापण भोगणारी बजरंगाची आई आहे. ऐन तारूण्यात विधवापण प्राप्त झालेली शकू, रघूची आई, लगमन्नाची बायको या स्त्रीयांच्या जीवना-तील विविध समस्या जाणवतात. या स्त्रिया सत्ताप्रमुखाच्या वासनेच्या आणि राजकारणाला बळी पडलेल्या दिसतात.

दाजीतात्यांच्या वागण्यामुळे गावातील सामान्य माणसांच्या जीवनाला महत्व राहिले नाही. मोलमजूरी करून जीवन जगणे एवढेच त्यांच्या नशिबी राहिलेले दिसते. दाजीतात्यांच्या मळयात त्यांना मजूरी करावी लागते. ग्रामीण विकासाच्या कोणत्याच योजना यांच्यापर्यंत पोहचलेल्या नसतात. त्यामुळे दुःख आणि दारिद्र्यात यांना जीवन जगावे लागते. लोकशाही राजकारणामुळे दलित-तांना सत्तेत सहभागी होता आले. त्याचा फायदा जालिंदर कांबळे घेतात. गावा-तील सत्ताप्रमुखांनी दलितांचा वापर फक्त राजकारणासाठी करुन घेतलेला दिसतो. ज्याना राज्कारणात संधी मिळाली त्यांनी स्वत:चा फायदा करून घेतला. बाकीचा दलित समाज उपेक्षित जीवन जगत राहिला.

सामान्य माणसांचा सतत कोंडमारा होऊ लागला. शेती व्यवसाय अडचणीत येऊ लागला. शेतक-यांच्या जीवनात कर्जबाजारीपणा वाढू लागला. त्यांचे आर्थिक, मानसिक आणि शारीरिक शोषण होऊ लागले. त्याचा

12233

A·

परिणाम सामान्य लोकांची प्रतिकारशक्ती दुबळी झाली. त्याचा फायदा गावातील सत्ताप्रमुखाने घेतलेला दिसतो. सत्तेच्या जोरावर दाजीतात्या अमाप संपत्ती जमवितात. साखरकारखान्यात वशिला लावून उसाचे वजन वाढवून घेतात. प्रगतशिल शेतकरी म्हणून मुलाचा सत्कार समारंभ घडवून आणतात. आपली प्रतिष्ठा जपण्याचा प्रयत्न करतात. परंतु त्यांची मुले व्यसनाधिन होतात. बापाच्या कमाईवर चैन करतात. त्याचा परिणाम तात्याच्या ऐश्वर्याला ओहटी लागल्याचे दिसू लागले.

"लिगाड"मधील मुख्य आशयसूत्र"बदलते ग्रामीण वास्तव" हे आहे. गावातील सत्ताप्रमुख लोकांची पिळवणूक करुन आपली सत्ता टिकविण्यासाठी अनेक भानगडी करीत असल्याचे दिसते. गावातील लोक पाठीमागे दाजीतात्यांची निंदा करतात. परंतु प्रत्यक्ष विरोध करण्याचे धाडस त्यांच्याजवळ नसते. सामान्य शेतक-यांच्या जीवनात नव्या समस्या उभ्या राहिलेल्या दिसतात. सहकाराच्या अनेक योजना खेडयात आल्या. शेती व्यवसायात बदल झाला. उत्पादनात वाढ झाली. तरीसुध्दा सहकाराचा फायदा सर्वांच्या पदरात पडलेला दिसत नाही.

गावगाडयातील सामान्य माणसांच्या जीवनात फारसे परिवर्तन झाले नाही. परंतु या जीवनात नव्या समस्या उभ्या राहिलेल्या दिसतात. ग्रामीण स्त्रियांचे जीवन शोषित राहिले. राजकीय डावपेचामुळे स्त्रियांचे जीवन असुरक्षित झालेले दिसते. ग्रामीण भागातील बदलत्या जीवनाबरोबर तेथील निसर्गही बदलला. इरिगेशनमुळे ओसाड माळरानावर हिरवेगार पिक डोलू लागले. त्यामुळे निसर्गात नवे चैतन्य निर्माण झाले. निसर्गातील रुक्षपणा जाऊन निसर्गात नवचैतन्य निर्माण झाले. ग्रामीण भागातही या बदलत्या निसर्गामुळे बदल झाल्याचा जाणवतो.

५. लिगाडमधील उपआशयसूत्रे :

५.१ लिगाडमधील बदलते शेतीचे स्वरूप :

समाजपरिवर्तनाबरोबर ग्रामीण भागात शेतीचे स्वरूपही बदलले आहे. लिगाडमधील कथानकात शेती व्यवसायाचे बदललेले चित्र रेखाटलेले दिसते. ग्रामीण भागात पारंपरिक पध्दतीने शेती करण्याची प्रथा बदलली आहे. शेतकरी नव्या पध्दतीने शेती करु लागल्याचे जाणवते. शेती व्यवसायाचे स्वरूप कसे बदलत गेले याचे स्वरूप आपणाला समजावून घ्यावयाचे आहे.

यांत्रिक जीवन :

ग्रामीण माणसाच्या जीवनात यंत्र आले. त्यामुळे त्यांचे जीवन यांत्रिक बनले. बैलाची जागा आता ट्रॅक्टरने घेतली. ट्रॅक्टरने नांगरणी, खत ओढणे ही कामे जलदगतीने होऊ लागली. मोटेने पाणी उपसण्याऐवजी वीस वीस अश्व-शक्तीच्या मोटर्सद्वारे पाणी उचलले जावू लागले. त्यामुळे विहिरीची अवस्था सर्व साज उतरलेल्या विधवा स्त्रीसारखी झाली. शेतीला पाटाचे पाणी मिळू लागले. शेतक-यांचे नशिब मोटर्सच्या रूपाने विहिरीवर बसले. परंतु ऐन उन्हा-ळ्यात पिकाला पाणी कमी पडल्यावर हे नशिब खिंडीत अडवून झोडपलेल्या पावसाप्रमाणे होऊ लागले. शेतक-यांचे बागायती क्षेत्र वाढले. त्यामुळे तो स्वत: कष्ट करण्याऐवजी बांधावरची शेती करु लागला.

"लिगाड" कादंबरीतील शेतीचे स्वरूप बदललेले आहे. पूर्वी नदीवर धरण नव्हते. वर्षातून चार महिने नदी वाहत असे. त्यावरच एखादे पिक शेतक-यां-च्या पदरात पडत असे. परंतु आता नदीवर धरण झाले. पिकाला हव्या त्या वेळी धरणाचे पाणी नदीत सोडले जाते. इलेक्ट्रिक मोटरने ते पाणी उपसून पाटाद्वारे शेतीला देतात. इरिगेशनामुळे उजाड माळरानसुध्दा हिरवेगार दिसू लागले. बागायती क्षेत्र वाढले. सर्वत्र ऊसाचे पिक डोलू लागले. जॉकवेल सुरु

झाल्यावर शेतकरी रात्रंदिवस बोल्ट आवळायचा पाना घेऊन पाटावरुन फिरु लागले. एखादा ऊसवाला पाटक-याचा डोळा चुकवून पाणी फोडून आपल्या उसात सोडू लागला. या धाधगीत शेतकरी घाईला आला. शेतकरी रासायनिक खताचा वापर करु लागला. लहान मुलाप्रमाणे उसाचे पिक जपू लागला.

उसाची बागायती वाढल्यामुळे खेडयात साखरकारखाना उभा राहिला. गावची सत्ता दाजीतात्याकडे असल्यामुळे सत्तेच्या जोरावर तो पाटाचे पाणी स्वत:च्या विहिरीत सोडू लागला. इतरांची पिके पाण्यावाचून जळू लागली. परंतु दाजीतात्या पाणी सोसायटीचे चेअरमन असतात. सोसायटीचे सारे खत आपल्या शेतीला वापरतात. साखरकारखान्यात वशीला लावून आपल्या उसाचे वजन वाढवून घेतात. आपली प्रतिष्ठा वाढविण्यासाठी मुलाचा आदर्श शेतकरी म्हणून सत्कारसमारंभ घडवून आणतात. सत्तेच्या जोरावर सहकाराचे सारे फायदे आपणाच भोगतात.

रघू हा "लिगाड" कादंबरीचा निवेदक आहे. रघूला वाटते आपल्या गावा नदी आहे. इरिगेशन आहे. आपली बागायती शेती आहे. गावात जावून शेती करावी अशी जीद्द बाळगून तो गावी येतो. गावात आल्यावर त्याला प्रत्यक्ष वेगळाच अनुभव येतो. गावातील सत्ताप्रमुखाकडून सामान्य शेतक-यांची कशी पिळवणूक होते याचा प्रत्यक्ष अनुभव त्याला येतो. ऐन उन्हाळ्यात पिकाला पाणी मिळत नाही.

पाण्याअभावी उसाचे पिक वाळू लागते. परंतु दाजी तात्यांच्या वागण्याला विरोध करण्याचे धाडस कोणी करत नाही. सामान्य शेतकरी दाजीतात्यांचा अन्याय निमूटपणे सहन करतात. रघू आणि शिवा दाजीतात्यांना विरोध करण्याचा प्रयत्न करतात. परंतु तात्या त्यांना अडचणीत आणून नमवितात. ज्यांच्या उसाला पाणी मिळत नाही तो शेतकरी दारु पिऊन सोसायटीपुढ बाब

मारतो व आपल्या घरात गप्प बसतो. सहकारामुळे शेतीचे स्वरूप बदलू लागले. शेतक-यांना वाटते आपले नशिब आता पालटणार. परंतु खरी परिस्थिती वेगळीच घडत असते. सतत उसाचे पिक घेतल्याने जमिनीचा पोत जातो. जमिनी निकृष्ठ बनतात. त्याचा परिणाम शेतीच्या उत्पादनात घट येऊ लागली. उसाचे बील सोसायटीच्या कर्जापोटी जमा होउ लागले. कष्ट करुनही शेतक-यांच्या हातात रोखड काहिच मिळेना. त्यामुळे शेतक-यांच्या जीवनात दारिद्र्य, उदासिनता आली. अशा अनेक समस्या निर्माण झाल्या. रघूला वाटते आपण पाणी सोसायटीचे सभासद आहोत. नियमाप्रमाणे आपण पाणी सोसायटी भरली आहे. पिकाला पाणी मिळने हा आपला हक्क आहे. पाणी सोसायटी सहकारी आहे. त्यावर कोणाचा मालकी हक्क नाही. परंतु प्रत्यक्षात उसाला पाणी मिळत नाही. त्यावेळी रघूला शेती व्यवसायातील नव्या समस्याची जाणीव होते.

## ५.२ ग्रामीण जीवनातील समस्या :

सामान्यत: कादंबरीत लेखक एक जीवनविषयक दृष्टीकोण व्यक्त करीत असतो. त्यासाठी तो पात्रांच्या माध्यमातून जीवनातील अनेक घटना व प्रसंगातून जीवन-विषयक समस्या निर्माण होतात. या समस्या जमाण्याच्या निरनिराळया स्वभाव-धर्मातून निर्माण होत असतात. "लिगाड" कादंबरीत अशा जीवनविषयक समस्या निर्माण झाल्या आहेत. माणसांच्या जीवनातील या समस्या बदलत्या ग्रामीण स्वरूपातून निर्माण झालेल्या जाणवतात. या समस्या निर्माण होण्याचे कारण खेडयातील राजकारणात सापडते. ग्रामीण विकासाच्या अनेक योजना खेडयात आल्या. त्यामुळे ग्रामीण जीवनाचा चेहरा बदलला. शेतीव्यवसायात अनेक सुधारणा घडवून आणल्या. त्याचा परिणाम उत्पादन वाढीवर झाला. शेतकरी रोखीची पिके घेऊ लागला. त्यामुळे त्याच्या हातात पैसा खेळू लागला. परंतु सामान्य शेतक-यांच्या जीवनात नव्याने समस्या उभ्या राहिल्या.

पाणी सोसायटीच्या चेअरमनकडे सत्तेचे केंद्रिकरण झाले. त्यामुळे शेत-क-यांची पिळवणूक सुरु झाली. चेअरमन गरीब शेतक-यांच्या रानात ट्रॅक्टर

चालवून नव्या वाटा पाडू लागला. पाणीपट्टी वेळेवर भरुनदेखील शेतीला पाणी मिळेना. वेळेवर खत मिळेना. शेतक-यांची पिके जळू लागली. सोसा-यटीच्या कर्जाचे हप्ते ऊसाच्या बीलातून घेतल्यामुळे शेतक-यांच्या हातात काहिच मिळेना. सतत ऊसाचे पिक घेतल्यामुळे जमिनीचा पोत कमी झाला. परिणामी उत्पादनात घट येऊ लागली. सत्ताप्रमुख सामान्य शेतक-यांना सतत अडचणीत आणू लागले. सर्व बाबतीत त्यांचे शोषण होऊ लागते. अशा विविध स्वरूपात शेतक-यांच्या जीवनात समस्या निर्माण होतात.

राजकारणामुळे गावात बदल होतो. सहकारामुळे सत्तेचे केंद्रस्थान दाजीतात्यांच्याकडे येते. दाजीतात्यांनी सहकाराचा फायदा स्वत:साठी जास्त करून घेतला. आपले राजकीय अस्तित्व टिकविण्यासाठी त्यांनी गावात दुफळी निर्माण केली. पिढयानपिढयाचे वैर माणसात निर्माण केले. त्याचा परिणाम गावातील लोकांचे जीवन अस्थिर झाले. जो दाजीतात्यांच्या वागण्याला विरोध करेल त्यांना माणसांतून उठविण्याचे डावपेच लढवू लागला. त्यामुळे सामान्य लोकांचे जीवन दुबळे झालेले दिसून येते.

बागायतदाराना भरपूर पैसा मिळू लागला. तो पैसा खर्च करण्याचे नवे मार्ग तो शोधू लागला. चैन, विलासी जीवन जगण्याकडे त्यांचा ओढा लागला. शहरात जाणे, अलिशान हॉटेलात पार्टी करणे, दारू पिणे, दौलतजादा करणे, आपल्या वासनेची भूक भागविण्यासाठी पैसा खर्च करू लागले. लग्नसमारंभात अमाप पैसा उधळू लागले. या गोष्टी त्यांना प्रतिष्ठेच्या वाटू लागल्या. बागायत-दारांची मुले चैनीत जीवन जगू लागली. त्याच्यांत व्यसनाधिनता वाढली. श्रीमं-तीची नशा त्यांना चढू लागली. त्यामुळे ती वाममार्गाने वागू लागली. मुलांच्या अशा वागण्यामुळे त्यांना आपली सत्ता व संपत्ती टिकविणे अवघड झाले.

रघूसारखा स्वाभिमानी तरूण दाजीतात्यांना उघडपणे विरोध करतो. रघूची पिळवणूक करण्याचा प्रयत्न तात्या करतात. परंतु तात्यांच्या सत्ता आणि

प्रतिष्ठेला हादरा बसतो. आपला भविष्यकाळ त्यांना दिसू लागतो. त्यामुळे ते बेचैन होतात. आजपर्यंत टिकवून ठेवलेली सत्ता मुलाच्या वागण्यामुळे जाणार याची जाणीव त्यांना होते. सत्ताप्रमुखाच्या अशा वागण्यामुळे त्यांच्या जगण्याला दुभंगलेपण येते.

दलित समाजात नव्या समस्या निर्माण झाल्या. दाजीतात्याने जालिंदर कांबळेला ग्रामपंचायतीत डेपुटीपद देऊन सारा दलित समाज आपल्या पाटीशी घेतलेला असतो. ज्यांना राजकारणात संधी मिळाली त्यांनी स्वतःचा फायदा करुन घेतला. बाकीच्या दलितांना काहीच मिळत नाही. दलितांना दाजीतात्यांच्या मळ्यात जगण्याशिवाय दुसरा आधार नसतो. त्यामुळे तात्या सांगतील त्याप्रमाणे त्यांना वागावे लागते. विकासाच्या कोणत्याही योजना दलितापर्यंत पोहचत नाहीत.

बदलत्या ग्रामीण जीवनात स्त्रियांच्या जीवनातही अनेक समस्या उभ्या राहिल्या. विधवा, परित्यक्ता दलित शेतकरी कुटुंबातील स्त्रियांचे जीवन शोचनिय झाले. गावातील राजकारणाच्या स्पर्धेत या स्त्रियांचा बळी जाऊ लागला. सत्ताप्रमुखाच्या वासनेच्या शिकार बनू लागल्या. दुःख दारिद्रय, कष्ट हे त्यांच्या नशिबी कायमचे राहिले. गावच्या विकासप्रक्रियेत याना सहभागी होता आले नाही. त्यामुळे स्त्रियांच्या जीवनात फरक पडल्याचे जाणवते नाही. आयुष्यभर रांडपण भोगत असलेली बजरंगाची आई शोषित जीवन जगते. आपली एकुलती एक मुलगी शकू विधवा होऊन आलेली तिला पाहवे लागते. शकूचा नवरा दारु पिऊन मरतो. आपल्या भावनेला ती आवर घालू शकत नाही. बबनबरोबर लग्न करण्याचा ती निश्चयकरते. परंतु दाजी-तात्या तिच्यावर बलात्कार करुन तिचे जीवन उद्ध्वस्त करतात. विधवा स्त्रि-यांच्या जीवनात अशा नव्या समस्या निर्माण झालेल्या दिसतात.

उनाड वागणारी लगमन्नाची बायको दाजीतात्याबरोबर अनैतिक संबंध

ठेवते. तिचा नवरा तात्यांच्या मळ्यात चाकरी राहतो. बागायतदारांच्या वासनेच्या शिकार या स्त्रिया होतात. बागायतदार आणि त्यांची मुले पैशाच्या जोरावर वासनेच्या आहारी गेलेले दिसतात. या तरुणांच्या वागण्यामुळे आब्रूदार स्त्रियांचे जीवन धोक्यात आलेले दिसते.

सामान्य माणसांच्या जीवनाला मोलच राहत नाही. शेतमजूरांची अवस्था शोचनिय होते. बडया बागायतदारांच्या मळ्याशिवाय याना काहीच काम मिळत नाही. पुरेसा रोजगार मिळत नाही. शिवाय बागायतदारांचीमुले तरुण स्त्रियांशी लगट करू पाहतात. लिगाडमधील विधवा शकू व लगमन्नाची बायको या स्त्रियाबरोबर बागायतदारांची मुले लगट करू लागली. त्यामुळे तरुण स्त्रियांना कामाला जाणे असुरक्षिततेचे वाटू लागले. सहकाराचा फायदा, ग्रामीण विकासाचा फायदा त्यांना मिळत नाही. सामान्य माणूस सतत नागवला गेला. त्यामुळे त्यांचे जीवन दुबळे आणि अस्तित्वहीन झाले.

## ५.३ ग्रामीण माणूस :

"लिगाड" कादंबरीत ग्रामीण माणूस हे उपआशयसूत्र आहे. ग्रामीण भागात जीवन जगणाऱ्या माणसांच्या जीवनाचे वेगळे स्तर आहेत. जगण्यातील वेगळेपणामुळे त्यांच्या स्वभावात विविधता असल्याचे जाणवते. जीवनातील या विविधतेमुळे त्यांच्या जगण्याला महत्व आलेले दिसते.

कादंबरीत कादंबरीकाराचा जीवनविषयक दृष्टीकोण साकार झालेला असतो. कादंबरीत समाजजीवनाचे चित्रणही लेखकाला करावयाचे असते. लेखकाला जे जीवन भावले आहे ते जीवन कादबरीत आकाराला येत असते. अनेक घटना आणि प्रसंगातून माणसांचे जीवन साकार करण्याचा प्रयत्न लेखक करीत असतो. "लिगाड" कादंबरीत ग्रामीण माणसाच्या जीवनातील विविधता साकार झालेली दिसते. ही विविधता पाहत असताना आपल्याला खालील

वैशिष्टये ठळकपणे जाणवतात.

जीवनातले दुभंगलेपण :

दाजी तात्या गावातील सत्ताप्रमुख आहे. सत्ता, संपत्ती आणि प्रतिष्ठा यांचे केंद्रिकरण तात्याजवळ आलेले दिसते. आपली सत्ता टिकविण्यासाठी तो सतत काहीतरी भानगडी करीत असतो. बलाच्या जोरावर गावातील लोकांची पिळवणूक करतो. त्याच्या राजकीय खेळीमुळे सामान्य लोकांचे जीवन अस्थिर होते. अमाप संपत्ती असूनही ही माणस जीवनात सुखी नाहीत. समाजात त्यांना खरेपणाने जगता येत नाही. आणि जगण्यातला खोटेपणाही लपविता येत नाही. धूर्तपणा, बेरकीपणा, जगण्यातली मग्रूरी यांच्याजवळ आहे. त्यांची संस्कारहीन मुले वाया जातात. त्यांच्या अनिर्बंध सत्तेला विरोध होऊ लागतो. आता आपले दिवस बदलणार याची जाणीव त्यांना होते. त्यातच त्यांच्या जगण्याला दुभंगलेपण आलेले दिसते. त्यामुळे तो खलप्रवृत्तीने वागतो.

शेतक-यांचे जीवन :

सामान्य शेतक-यांना सतत दाजीतात्याच्या दबावाखाली जगावे लागते. तात्याला विरोध केला तर त्यांची पिळवणूक होते. यांचे सतत आर्थिक, मानसिक शारीरिक शोषण होते. सहकाराचा फायदा याना मिळत नाही. गावातील राजकारणामुळे दुफळी निर्माण होते. वैरत्वाची भावना जोपासली जाते. याचा परिणाम शेतकरी कर्जबाजारी झाला. त्यामुळे त्याच्या जीवनात दारिद्रय, वैफल्य वाढले. उदासिनता वाढत गेली. जगण्यातला उत्साह कमी होऊ लागला. तो निराशजनक जीवन जगू लागला.

स्त्री जीवन :

"लिगाड" कादंबरीत स्त्रियांच्या जीवनाची अवस्था फार शोषनीय आहे.

गावात विधवा, परित्यक्ता दलित स्त्रिया बागायतदारांच्या वासनेच्या शिकार झालेल्या दिसतात. राजकारणातील डावपेच लढवताना स्त्रियांचा बळी घेतलेले चित्र दिसून येते. "लिगाड"मध्ये शाकूवा भाऊ बजरंग दाजीतात्यांच्या राजकारणाला विरोध करतो. त्याचा विरोध मोडून काढण्यासाठी व त्याचे खच्चीकरण करण्यासाठी दाजीतात्या त्याची बहिण शाकूवर बलात्कार करतात. शाकूचे आयुष्य संपवतात. बदलत्या ग्रामीण जीवनात स्त्रीला कसल्याही प्रकारचे स्वातंत्र राहिलेले दिसत नाही. अज्ञान, अंधश्रध्दा, दारिद्र्य, गुलामगिरी यामुळे स्त्रियांना हलाकीचे जीवन जगावे लागत असल्याचे दिसते.

सामान्य माणूस :

"लिंगाड"मधील सामान्य माणसांचे जीवन दरिद्री असलेले जाणवते. आयुष्यभर कष्ट करुन त्यांच्या नशिबी काहीच नसते. ग्रामीण विकासाचे वारे त्यांच्यापर्यंत पोहचत नाही बागायतदारांच्या मळ्याशिवाय याना रोजगार मिळत नाही. आयुष्यभर दु:ख, दारिद्र्य, उपासमार एवढेच त्यांच्या नशिबी असते. त्यामुळे दुबळे जीवन त्यांना जगावे लागते. गावात याना अस्तित्व नसते. यांची सतत कुचंबना झालेली दिसते. अन्यायाविरूध्द प्रतिकार करण्याची शक्ती यांच्याकडे नाही. म्हणून ते निमूटपणे सहन करत असतात.

दलित जीवन :

लोकशाहीत दलितांना सत्तेत सहभागी होता आले. ज्याना राजकारणात संधी मिळाली त्यांनी स्वत:चा फायदा करुन घेतलेला दिसतो. बाकीचा दलित समाज दारिद्र्यात जीवन जगत राहिला. "लिगाड"मध्ये जालिंदर कांबळे दलितांचा पुढारी असतो. दाजीतात्यांनी त्याला डेपुटी सरपंच केलेले असते. दाजीतात्यांच्या पाटीशी राहूनत्याने आपल्या भावाला नोकरीला लावलेले असते. नवे घर बांधलेले असते. स्वत:चा फायदा करुन घेतो. त्याचा परिणाम दलितांच्या जगण्यातही दोन स्तर निर्माण झालेले दिसतात.

बदलत्या ग्रामीण जीवनात सत्ताप्रमुखाकडून सामान्य माणसांच्या जीवनाची सतत परवड होत राहिली. त्यांचे सतत शोषण होऊ लागले. त्यामुळे त्यांच्या जीवनात दुःख आणि दारिद्र्य नवे रूप घेऊन आलेले जाणवते. सहकाराच्या माध्यमातून विकास होण्याऐवजी लोकांच्या जीवनात अनेक समस्या उभ्या राहिल्या. सत्ताप्रमुखांच्या जीवनात वेगळया समस्या उभ्या राहिल्या. जगण्यातल्या वेगळेपणामुळे, विविधतेमुळे ग्रामीण माणसाच्या जीवनात अशा अनेक समस्या निर्माण झाल्या.

## ५.४ <u>निसर्गचित्रण :</u>

"लिगाड" कादंबरीत जो निसर्ग आला आहे तो कोल्हापूर जिल्हयातील पूर्वभागाचा निसर्ग आहे. या कादंबरीत निसर्ग वेगळेपण घेऊन साकार झालेला दिसतो. मराठी कादंबरीतील पारंपरिक निसर्ग सौंदर्य येथे दिसत नाही. बदलत्या ग्रामीण जीवनाबरोबर तेथील निसर्ग कसा बदलत गेला आहे याचे दर्शन या कादंबरीत होते.

"लिगाड" कादंबरीतील निसर्ग तेथील ग्रामीण जीवनाचे एक अविभाज्य अंग झाला आहे. या निसर्गसौंदर्यामुळे ग्रामीण जीवनात नवे चैतन्य निर्माण झालेले दिसते. पूर्वीचा रूक्षपणा आता निसर्गात राहिला नाही. खेडेगाव तेथील मातीची घरे, सभोवताली उजाड माळरान, रणरणते ऊन यामुळे होणारी जीवनाची तगमग हे चित्र आज ग्रामीण भागात दिसत नाही. धरण आणि इरिगेशन यामुळे बदललेल्या परिसराचे चित्रण "लिगाड" मध्ये आले आहे.

बदलत्या ग्रामीण जीवनाबरोबर तेथील परिसर बदलत गेल्याचे गेल्याचे चित्र "लिगाड"मध्ये दिसते. "लिगाड" मधील कथानक पाहत असताना आपणाला तेथील पाटाचे पाणी, हिरवीगार शेती, ऊसाची बागायती, अंब्याची झाडे, विविध प्रकाराच्या फळांच्या बागा याचे चित्र उभे राहते. "लिगाड"मधील या

बदलत्या निसर्गसौंदर्याने ग्रामीण जीवनातही नवचैतन्य निर्माण केलेले दिसते. इरिगेशनमुळे निसर्गातील रुक्षपणा जाऊन नवे चैतन्य निर्माण झाले. तसेच बदलता निसर्ग माणसाच्या जीवनातील नव्या समस्याना तोंड देण्याचे सामर्थ्य निर्माण करु लागला. असे बदलते रुप घेऊन निसर्ग या कादंबरीत आलेला आहे. निसर्गाच्या या बदलत्या स्वरूपामुळे कादंबरीतील कथानकाला वास्तवता आलेली जाणवते. म्हणून "लिगाड" मधील निसर्गचित्रण हे वैशिष्टयपूर्ण असलेले जाणवते.

"लिगाड" कादंबरीतील आशयसूत्राचा अभ्यास करताना आपणाला प्रथम लेखकाचा जीवनविषयक दृष्टिकोण जाणवतो. बदलत्या ग्रामीण जीवनाचे चित्रण अत्यंत बारकाईने टिपलेले दिसते. "बदलते ग्रामीण वास्तव" हे या कादं-बरीचे मूख्य आशयसूत्र आहे. या आशयसूत्राला उठावदारपणा प्राप्त होण्या-साठी या कादंबरीत अनेक उपआशयसूत्रे आली आहेत. शेतीचे बदलते स्वरूप चित्रित झालेले आहे. शेती व्यवसायातील बदल महत्वाचा आहे. गावात विकासाच्या अनेक योजना आल्यामुळे ग्रामीण जीवन बदलू लागले. सहकाराच्या माध्यमातून अनेक अडचणी सोडविल्या जावू लागल्या. ग्रामीण जीवनात बदल होऊ लागला तशा नव्या समस्या त्यांच्या जीवनात उभ्या राहिलेल्या दिसतात. गावचा सत्ताप्रमुख आपली सत्ता टिकविण्यासाठी गावची पिळवणूक करु लागला. डावपेचाचे राजकारण सुरु झाले. गावातील सत्ताप्रमुख सहकाराचा फायदा घेऊ लागले. सामान्य लोकांना याचा पुरेपुर फायदा उपभोगता आला नाही.

सामान्य माणसांच्या जीवनात विविध प्रकारच्या समस्या उभ्या राहिलेल्या दिसतात. स्त्रियांच्या जीवनातील अज्ञान, अंधश्रध्दा, पिळवणूक कमी झालेली दिसत नाही. बदलत्या ग्रामीण जीवनात स्त्र या सत्ताप्रमुखाच्या वासनेच्या शिकार होऊ लागल्या. राजकारणाच्या भानगडीत त्यांचा बळी जाऊ लागला. ज्यांना राजकारणात संधी मिळाली असा दलित आपला फायदा करून घेऊ लागला.

दलितांचा वापर केवळ राजकीय पाठिंब्यासाठी होऊ लागला. गावच्या सत्तेतील त्यांचे स्थान नाममात्र राहिलेले दिसते.

बदलत्या ग्रामीण जीवनात विविध स्तर निर्माण झालेले जाणवतात. यामुळे एकमेकांचे शोषण चालू झाले. जो धूर्त होता. ज्याच्याजवळ बेरकीपणा होता अशा माणसानी आपला फायदा करुन घेतला. बाकीच्या लोकांच्या जीवनात सतत नव्या समस्या उभ्या राहिलेल्या दिसतात.

"खांदेपालटमधील आशयसूत्रे :

मोहन पाटील यांच्या "लिगाड" आणि "खांदेपालट" या दोन लघु - कादंबऱ्यात उपआशयसूत्राचे पदर वेगळे जाणवतात. या आशयसूत्रांचे स्वरुप पाहत असताना लेखकाचा बदलत्या ग्रामीण जीवनाकडे पाहण्याचा एक दृष्टीकोण जाणवतो. ग्रामीण मनाला स्पर्श करण्याचे वैशिष्टये त्यांच्या कादंबरीत जाणवते. "खांदेपालट" कादंबरीतील आशयसूत्राचा अभ्यास करताना ग्रामीण भागातील राजकारणाचे बदलते चित्र जाणवते. ग्रामीण भागातील राजकारण त्यांच्या जीवनाशी कसे एकरुप झाले आहे हे दिसून येते.

"खांदेपालट" कादंबरीत अनेक उपआशयसूत्रे आली आहेत. "ग्रामीण भागातील बदलते राजकारण" हे"खांदेपालट" कादंबरीतील मूख्य आशयसूत्र आहे. या आशयसूत्राला उठावदार पणा आणण्यासाठी या कादंबरीतील उपआशयसूत्राना महत्व आलेले आहे. त्यामधील ठळकपणे जाणवणारी उपआशयसूत्रे खालीलप्रमाणे आहेत.

१) ग्रामीण व्यवस्था
२) ग्रामीण जीवनातील समस्या
३) ग्रामीण माणूस
४) ग्रामीण वातावरण

अशी अनेक उपआशयसूत्रे "खांदेपालट" या कादंबरीत आली आहेत. ही सर्व उपआशयसूत्रे मूख्य आशयसूत्राला बळकटी आणत असल्याचे दिसते. या उपआशयसूत्रामुळे मूख्य आशयसूत्र ठळकपणे जाणवत असल्याचे सकृतदर्शनी दिसते.

६) "खांदेपालट"मधील मूख्य आशयसूत्र

ग्रामीण भागातील बदलते राजकारण :

प्राचीन काळापासून पाटील हा खेडेगावचा सत्ताप्रमुख होता. गावचे सर्व अधिकार त्याच्याकडे होते. स्वातंत्र्यानंतर लोकशाही राजवट आली. खेडयात पंचायती राज्य आले. ग्रामीण विकासाच्या अनेक योजना खेडयात आल्या. ग्रामीण भागात सहकाराचे जाळे विणले जाऊ लागले. सर्वांना मतदानाचा अधिकार मिळाला. खेडयात जो धूर्त होता, ज्याच्याजवळबेरकीपणा होता, जगण्यातली मग्रूरी होती अशा माणसांनी राजकारणातील विरोध मोडून काढला. सहकारातील प्रमुखाकडे सत्ता आली. त्यामुळे सत्तेचे केंद्रस्थान तो झाला. सत्तेचे केंद्रस्थान बदलल्यामुळे ग्रामीण जीवनाचे बलस्थानही बदलले. आपली सत्ता टिकविण्यासाठी तो ग्रामीण जनतेची पिळवणूक करू लागला. ग्रामीण जनतेचा विकास करण्याऐवजी स्वत:चा फायदा करून घेऊ लागला. त्याचा परिणाम सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा त्याला मिळू लागली. या राजकारणातून ग्रामीण जीवनात विविध स्तर निर्माण झाले.

"खांदेपालट" कादंबरीत धोंडीनाना हे सत्तेचे केंद्रस्थान आहेत. गावचा सरपंच, शाळेचा चेअरमन, पाणी सोसायटीचा चेअरमन, साखरकारखान्याचा संचालक अशा विविध अधिकाराच्या जागेवर धोंडीनाना आहेत. बेरकीपणामुळे आपले राजकीय आसन ते पक्के करतात. नानाची अकरा एकर ऊसाची बागायती जमीन आहे. ट्रक, बुलेट, चिरेबंदी वाडा या वस्तू नानांच्या ऐश्वर्याचे प्रतिक आहेत.

ग्रामपंचायतीत नानांच्या बाजूने बहूमत नसते. त्यामुळे नानाला सरपंच होता येत नाही. म्हणून नाना डावपेच लढवतात. ग्रामपंचायतीत रोटेशन पध्दत ठेवतात. दरवर्षी सरपंचपद बदलायचे असे ठरते. या रोटेशोन पध्दतीमध्ये नाना प्रथम सरपंच होतात. नाना सरपंच झाल्यावर दलितांचा पाठिंबा मिळ-विण्यासाठी तो यलाप्पा कांबळेला डेपुटी सरपंच करतात. नानांनी आपल्या कारकिर्दीत कोणकोणती कामे करावयाची हे ठरलेले असते. पिण्याच्या पाण्या-साठी बोर मारणे, रस्ते चांगले करणे, सार्वजनिक संडास बांधणे, बालवाडी चालविणे, अशाप्रकारचे ग्रामीण विकासाची कामे नानांनी करावयाची असे ठरलेले असते. परंतु नाना आपल्या कारकिर्दीत कोणत्याच प्रकारची कामे करीत नाहीत. सरकारी पैसा खातात. नानाच्या वागण्याला विरोध करणारे तुकाराम पाटील म्हणजे देव एकच व्यक्ती असते. परंतु नाना आपल्या धूर्तपणाने देवांचे राजकीय कंबरडे मोडून काढतात.

नाना ग्रामपंचायतीच्या सदस्यात फोडाफोडी सुरु करतात. मराठा आणि जैन यांच्यात भांडण लावतात. महार आणि चांभार यांच्यात सार्व-जनिक तालमीचा प्रश्न उभा करतात. भावाभावात, कुटुंबा-कुटुंबात कायमचे वैर निर्माण करतात. गावात दुफळी निर्माण करतात. माणसामाणसात पिढयान्-पिढयाचे वैर जोपासले जाते. त्यामुळे सारे जीवन अस्थिर होते. याचा फायदा नाना उठवितात. प्रत्येकाला अडचणीत आणून त्याचे खच्चीकरण करण्याचा प्रयत्न नाना करतात. शिवाय भांडण मिटवायला आपणच पुढाकार घेतात. सारा गाव आपल्या मूठीत ठेवतात.

लकुळ्या चांभार ग्रामपंचायतीत सभासद असतो. लकुळ्याची शिट देवांच्या बाजूने असते. एक दिवस लकुळ्याच्या भावाची मुलगी राजी नानांच्या मळयात मारूतीबरोबर लगट करताना नानाला सापडते. मारुती नानांच्या मळयात राखण करायला असतो. नाना मारूतीला मार देऊन पिटावतात.

राजीला ऊसात नेऊन तिच्यावर बलात्कार करतात. आपल्या वासनेची भूक भागविल्यावर तिला मारून विहिरीत टाकतात. राजीच्या मृत्यूचे प्रकरण मिटविण्यासाठी लकुल्या नानांकडे येतो. नाना पुढाकार घेऊन प्रकरण मिट-वतात. त्यांना पोलीसाची धमकी देतात. त्यामुळे लकुल्याची शिट नानांच्या बाजूने येते. राजीला मारण्यापाठीमागे नानांचे राजकीय डावपेच असतात.

यल्लाप्पा कांबळे आणि रामभाऊ गावडे या दोन माणसाना हाताशी धरून नाना आपले राजकारण खेळतात. यलाप्पा कांबळेला हरिजन वाड्यातील पुढारी करतात. ग्रामपंचायतीचा टी.व्ही. हरिजन वाड्यात लावण्याचे आमिष दाखवितात. परंतु गावातील मुले टी.व्ही.ची काच फोडून टाकतात. रामभाऊ गावडे नंदीबैलासारखा मान डोलावून नानांच्या बोलण्याला होकार देतो. राम-भाऊला स्वत:चे अस्तित्व नसते. नानाला राजकीय सल्ला देण्याचे काम तो करतो. ग्रामपंचायतीच्या मिटिंगच्यावेळी नानानी यलाप्पाला अगोदरच शिकवून तयार केलेला असतो. नाना जो निर्णय घेतील त्याला होकार देण्याचे काम ते करतात.

हरिजन वाड्यात बालवाडी चालविण्यासाठी मिळालेले पैसे यलाप्पा स्वत:चे घर बांधण्यासाठी वापरतो. बाकीच्या दलित समाजाला राजकारणा-पासून कोणताच फायदा होत नाही. नानांचा एकुलता एक मुलगा बाळासाब वाया जातो. चांभाराची राजी त्यांच्या मळयात मजूरीसाठी येते. बाळासाब तिच्याबरोबर लगट करतो. नानांनी राजीला मारल्याचा संशय बाळासाबला येतो. त्यामुळे त्याचे वागणे बदलू लागते. देवगुणाचा बाळासाब व्यसनाधिन होतो. तो दारु पिऊ लागतो. स्त्रीलपंट बनतो. आपल्या मुलाची काळजी नानाला लागते. नाना मनाने खचत जातात. त्यांचे काळीज आतून पोखरत असते.

धोंडीनाना आपले जगण्यातले खोटेपण सतत लपविण्याचा प्रयत्न करतात. गावात खरेपणानेही त्यांना जगता येत नाही. आता आपले दिवस बदलणार याची जाणिव त्यांना होते. नानांच्या पायावर असणाऱ्या काळ्या इसबाच्या डागाप्रमाणे नानांच्या ऐश्वर्याला किड लागते. त्यामुळे नानांच्या जगण्याला दुभंगलेपण प्राप्त होते. बदलत्या ग्रामीण जीवनात नाना आपले राजकीय आसन स्थिर करण्यासाठी सामान्य माणसांच्या जीवनाशी खेळ खेळतात. अनेक प्रकारचे डावपेच लढवून लोकांना अडचणीत आणतात. गावात दुफळी निर्माण करतात. त्यामुळे गावातील स्वास्थ बिघडते. नानांच्या दुटप्पी वागण्याला लोक कंटाळतात. परंतु नानांच्या वागण्याला विरोध करण्याचे धाडस कोणाचे होत नाही. देवा-सारखा निस्वार्थी माणूस नानाला उघडपणे विरोध करतो. परंतु पंचायतीच्या सभासदात फोडाफोडी करून नाना देवासारख्या माणसाचे राजकीय कंबरडे मोडतात. त्यामुळे नानाला विरोध करणारा गावात कोणी शिल्लक राहत नाही. ग्राम-पंचायतीतील रोटेशनपध्दत नाना मोडीत काढतात. त्यामुळे इतर सभासद राज-कारणात आपला उत्साह दाखवित नाहीत. नाना करतील ती पूर्वदिशा अशी गावाची अवस्था होते.

बदलत्या ग्रामीण जीवनात सत्तेचे केंद्रस्थान बदलल्यामुळे ग्रामीण जीवनाचे बलस्थानही बदलले. गावातील राजकारण प्रतिष्ठेचा विषय होतो. ज्याच्याकडे सत्ता, संपत्ती आली त्यांनी ग्रामीण जीवनावर आपला दबाव आणला. त्यातून स्वत:चा फायदा करून घेतला. सामान्य जनता राजकारणामुळे अडचणीत येऊ लागली. त्याचा परिणाम ग्रामीण जनतेच्या जीवनावर होऊ लागला. लोकशाही राजकारणामुळे ग्रामीण जीवनात विविध स्तर निर्माण झाले. त्यामुळे साऱ्या जीवनात विविध स्तर निर्माण झाले. त्यामुळे सारे जीवनच त्यामध्ये भरडले गेल्याचे दिसते.

## ७."खांदेपालट"मधील उपआशयसूत्रे :

### ७.१ ग्रामीण व्यवस्थापन :

"खांदेपालट" कादंबरीत ग्रामीण भागातील बदलत्या व्यवस्थापनाचे चित्रण आले आहे. स्वातंत्र्यानंतर लोकशाही राजकारण गावात आले.सर्वांना मतदानाचा अधिकार मिळाला. राजकारणात सहभागी होण्याची संधी सर्वांना मिळाली. त्याबरोबर ग्रामीण विकासाच्या अनेक योजना खेड्यात आल्या. सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण विकासाला चालना मिळाली. त्याचा परिणाम गावचा चेहरामोहरा बदलत गेला. गावची सत्ता परंपरागत पाटलाकडे होती. त्याची जागा बदलली. सहकारातील प्रमुखाकडे सत्तेचे केंद्रस्थान आले. ग्रामीण भागात सत्तेचे केंद्रस्थान बदलल्यामुळे ग्रामीण जीवनाचे स्वरूपच बदलले.

"खांदेपालट" कादंबरीत ग्रामीण व्यवस्थापन बदललेले जाणवते. धोंडीनाना गावातील श्रीमंत बागायतदार आहेत. गावातील सत्ता त्यांच्याकडे असते. गावचे सरपंच, पाणी सोसायटीचे चेअरमन, शाळेचे चेअरमन, साखरकारखान्याचे चेअरमन् अशा अधिकारावर नाना आहेत. या सत्तेच्या जोरावर गावातील लोकांची पिळवणूक करतात. आपले राजकीय आसन बळकट करण्यासाठी अनेक डावपेच लढवितात. त्यामुळे गावात दुफळी निर्माण होते. गावात अस्थिर वातावरण निर्माण करतात. जातीजातीत भांडण लावतात. भावकीत वैर निर्माण करतात. यातून नाना आपला राजकीय फायदा करून घेतात.

ग्रामपंचायतीत तुकाराम पाटील यांच्या बाजूने बहूमत असते. तुकाराम पाटील निस्वार्थी जीवन जगत असतो. त्याच्या निस्वार्थी वागण्यामुळे गावातील लोक त्यांना देव म्हणतात. गावचा सरपंच होण्याची संधी तुकाराम पाटलांना असते. परंतु नाना राजकीय डावपेच खेळतात. गावचा विकास करण्याची संधी सर्वांना मिळावी म्हणून ग्रामपंचायतीत रोटेशन पध्दत ठेवतात.

प्रत्येकानी ग्रामीण विकासाची कोणती कामे करावयाची ते ठरवितात. आणि प्रथम आपण सरपंच होतात. सरपंच होण्यासाठी नाना असे राजकारण खेळतात. सरपंच झाल्यावर आपल्या कारकिर्दीत ग्रामीण विकासाची कोणतीच कामे करत नाहीत. सरकारी पैसा खातात. ज्यावेळी सरपंच होण्याची पाळी देवाची असते. त्यावेळी नाना "खांदेपालट" न करता रोटेशन पध्दत मोडीत काढतात.

धोंडीनाना ग्रामपंचायतीत आपल्या बाजूने बहूमत होण्यासाठी अनेक भानगडी करतात. महार आणि चांभार यांच्यात सार्वजनिक तालमीचा प्रश्न उपस्थित करतात. मराठा आणि जैन यांच्यात संघर्ष निर्माण करतात. हरिजनाला ग्रामपंचायतीचा टी.व्ही. देण्याचे आमिष दाखवितात. लकुळ्या चांभाराची शिट आपल्या बाजूने घेण्यासाठी नाना वेगळे कारस्थान करतात. लकुळयाच्या भावाची मुलगी राजीवर नाना बलात्कार करतात. तिला मारून विहिरीत टाकतात. राजीच्या मृत्यूचे प्रकरण मिटविण्यासाठी नाना पुढाकार घेतात. भितीने लकुळया नानांच्या बाजूने येतो. नाना त्याला डेपुटी सरपंच करतात. राजकारणात विरोध करणाऱ्या देवाच्या बाजूचे सभासद आपल्याकडे घेतात.

धोंडीनाना आपल्या धूर्त आणि बेरकीपणामुळे देवांचे राजकारणातील अस्तित्व संपवतात. गावातील लोकाना अडचणीत आणतात. नानाला विरोध करणाऱ्या लोकांच्या ऊसाला वेळेवर पाणी मिळेना. त्यामुळे सामान्य शेतकरी नानांला विरोध करण्याच्या वाटेला जाईना. लोकशाहीत दलितांना प्रथमच राजकारणात संधी मिळाली. ज्यांना संधी मिळाली त्यांनी स्वत:चा फायदा करून घेतला. गावातील सत्ताप्रमुखाच्या बरोबर राहून आपले हित साधले.. त्याचा परिणाम दलित जीवनातही दोन स्तर निर्माण झालेले दिसतात. बाकीचा दलित समाज उपेक्षित राहिला. गावातील सत्ताप्रमुख धोंडीनानांनी दलितांचा वापर फक्त राजकारणासाठी करून घेतला. परंतु त्यांच्या विकासाचा कधी विचार केला नाही.

गावातील सामान्य जीवन जगणा-या माणसाला, मजुराना, दलितांना, राजकारणात सहभागी होता आले नाही. सत्ताप्रमुखाच्या वर्चस्वाखाली निमूट-पणे अन्याय सहन करीत लोक जीवन जगू लागले. या बदलत्या व्यवस्थापनात स्त्रियांच्या जीवनात अनेक समस्या उभ्या राहिल्या. विधवा परित्यक्ता, दलित स्त्रियांच्या जीवन हलाकीचे असल्याचे दिसून येते. सत्ताप्रमुखाच्या वासनेची भूक भागविण्यासाठी निराधार स्त्रियांवर अन्याय होऊ लागले. राजकीय खेळी खेळ-ताना निरपराध स्त्रियांचा बळी जाऊ लागला. याचा परिणाम स्त्रियांच्या जगण्याला अस्तित्व राहिले नाही.

७.२ <u>ग्रामीण जीवनातील समस्या :</u>

"खांदेपालट" कादंबरीत ग्रामीण जीवनातील समस्या हे उपआशयसूत्र आहे. बदलत्या राजकीय व्यवस्थापनामुळे लोकांच्या जीवनात अनेक समस्या नव्याने उभ्या राहिलेल्या दिसतात. स्वातंत्र्यानंतर पंचायती राज्य आले. त्याबरोबर ग्रामीण विकासाच्या अनेक योजना खेडयात आल्या. शेती व्यवसायात बदल झाला. इरिगेशनमुळे ऊसाचे पिक वाढले. फळांच्या बागा उभ्या राहिल्या. त्याचा परिणाम शेतक-यांना पैसा मिळू लागला. हा पैसा खर्च करण्याचे नवे मार्ग तो शोधू लागला. त्यातूनच त्यांच्या जीवनात अनेक समस्या निर्माण झाल्याचे जाणवू लागले.

"खांदेपालट" मध्ये धोंडीनाना गावचे सरपंच असतात. आपली सत्ता टि-किवण्यासाठी तो गावातील लोकावर दबाव आणू लागला. राजकारणात विरोध करणा-या लोकांना नानांनी माणसातून उठविले. महार आणि चांभार या दोन जातीत तालमीच्या जागेसाठी कायमचे वैर निर्माण झाले. मराठा आणि जैन यांच्यात भांडण लावले. भावाभावात वैर निर्माण करुन भांडण सोडविण्या-साठी आपण जायचे. नानांच्या अशा वागण्यामुळे गावातील सामान्य लोकांचे

जीवन अस्थिर झाले. देवासारख्या निःस्वार्थी माणसाला नाना राजकारणातून उठवितात. गावचा विकास करण्याची तळमळ त्यांच्याजवळ असते. परंतु पंचायतीच्या सदस्यात फोडाफोडी करुन देवांना राजकारणातून संपवतात.

यलाप्पाला हाताशी धरुन सारा दलित समाज पाठीशी घालतात. प्रत्यक्ष दलितांना राजकारणात सहभागी होता येत नाही. त्यांना दारिद्र्यातच जीवन जगावे लागते. रामभाऊ गावडेसारखी माणसे नानांच्या बाजूने असतात. नानाला अडचणीच्यावेळी राजकीय सल्ला देण्याचे काम करतात. ग्रामीण भागातील स्त्रियांच्या जीवनात नव्याने समस्या उभ्या राहतात. राजी नानांच्या वासनेची शिकार बनते, राजकारणात नाना तिचा बळी घेतात. नानांची बायको भागिरथीला कसल्याही प्रकारचे स्वातंत्र्य नसते. घरातच तिला जगावे लागते. दलित समाजातील चंदाला दररोज गवताचा भारा विकल्याशिवाय पाटाला अन्न मिळत नाही. बदलत्या राजकारणापासून स्त्रिया दूर राहिलेल्या जाणवतात.

गावातील सामान्य शेतकरी व शेतमजूरांची परिस्थिती दयनिय असते. नानांच्या बागायती मळयाशिवाय यांना मजूरी नसते. गावच्या विकासाची कोणतीही योजना यांच्यापर्यंत पोहचली नाही. शिवाय मजूरीला गेलेल्या त तरुण स्त्रियांची आब्रु सुरक्षित राहण्याची वेळ राहिली नाही. तरुण मजूर स्त्रिया बागायतदार आणि त्यांची मुले यांच्या वासनेच्या शिकार होऊ लागल्या म्हणजे सामान्य माणसांच्या जीवनातही अनेक समस्या नव्याने उभ्या राहिलेल्या दिसतात.

" खांदेपालट" कादंबरीत बदलत्या राजकीय व्यवस्थापनामुळे लोकांचे जीवनात समस्या उभ्या राहिल्या. राजकारणामुळेच या समस्या नवे रुप घेऊन आलेल्या दिसतात.

७.३ ग्रामीण माणूस :

ग्रामीण माणूस हे "खोंदेपालट" कादंबरीतील एक उपआशयसूत्र आहे. ग्रामीण भागात राजकारणाचे चित्र बदलले. बदलत्या राजकीय व्यवस्थेमुळे ग्रामीण जीवनात विविध स्तर निर्माण झालेले दिसून येतात. त्यामुळे ग्रामीण माणसाच्या जगण्यातली विविधता जाणवते. यांचे जगणे अनेक वैशिष्ट्यपूर्णतेचे असल्याचे जाणवत राहते. ग्रामीण माणसाच्या जीवनाचे ठळकपणे वेगळेपण जाणवते.

"खोदेपालट" कादंबरीत धोंडीनाना सत्ताप्रमुख आहेत. आपले राजकीय आसन बळकट करण्यासाठी नाना अनेक भानगडी करतात. लोकांची पिळवणूक करतात. लोकांत वैरत्वाची जोपासना करतात. आपले अस्तित्व टिकविण्या-साठी ते सत्ता आणि संपत्तीचा वापर करतात. यामध्ये आपल्या जगण्यातला खोटेपणा त्यांना लपविता येत नाही. जीवनात खरेपणानेही त्यांना वागता येत नाही. आपल्या वाया गेलेल्या मुलाचे जीवन पाहिल्यावर त्यांना भविष्य-काळ दिसू लागतो. त्यामुळे ते मनाने खचतात. अशा वागण्यामुळे त्यांच्या जगण्याला दुभंगलेपण प्राप्त होते. एका बाजूला हिन प्रवृत्तीचे वागणे आणि दुस-या बाजूला प्रतिष्ठा जोपासण्याचा प्रयत्न यामुळे त्यांचे जीवन अस्थिर होते. त्यांच्या व्यक्तिमत्वाला दुभंगलेपण प्राप्त होते.

सामान्य शेतकरी सतत अडचणीत आलेला जाणवतो. राजकारणात विरोध केला किंवा पाठिंबा दिला नाहीतर शेतक-यांच्या उसाचे पाणी अडविले जाऊ लागले. राजकारणात विरोध करणा-या माणसाला जीवनातून उठविण्याचे सत्र चालू झाले. त्यामुळे लोक राजकारणाला कंटाळले. राज-कारणाच्या परिणामुळे माणसातले माणूसपण हरवत गेले. गावात पिढयान-पिढयाचे वैर जोपासले जावू लागले. जातीजातीत भांडण, भावाभावात वैर, कुटुंबात अस्थिरता निर्माण झालेली दिसू लागले. त्याचा परिणाम गावातील

जीवन अस्थिर झालेले दिसून येऊ लागले. गावातील या अस्थिर जीवनाचा फायदा राजकारणात जो बेरकी होता. ज्याच्याजवळ धूर्तपणा होता. जगण्यातली मग्रूरी ज्याच्याजवळ होती, मनगटशाही ज्याच्याकडे होती त्यांनी घेतलेला दिसतो.

राजकारणातील विरोधाचा परिणाम सामान्य माणसाच्या जीवनावर होऊ लागला. त्यांचे जगणे धोक्यात आले. सतत सत्ताप्रमुखाच्या दबावाखाली त्यांना जगावे लागले. त्यामुळे सतत त्यांचा कोंडमारा होऊ लागला. त्यांचे आर्थिक, मानसिक, आणि शारीरिक खच्चीकरण होऊ लागले. त्यांच्या जगण्यात निराशा वैफल्य वाढू लागलेले दिसते. ग्रामीण भागातील स्त्रियांच्या जीवनावरही परिणाम झालेला दिसतो. विधवा, परित्यक्ता, दलित, शेतमजूर स्त्रिया सत्ताप्रमुखाच्या वासनेची शिकार होऊ लागल्या. राजकारणापासून या स्त्रिया कायमच्याच दूर राहिलेल्या दिसतात. त्यांच्या जगण्याला अस्तित्व राहिलेले दिसत नाही. स्त्रियांची अशी शोचनिय अवस्था झालेली दिसते.

बदलत्या ग्रामीण राजकारणात शेतमजूरांच्या नशिबी दु:ख आणि दारिद्र्य कायमचेच असलेले दिसते. राजकारणाचा फायदा या स्तरातील लोकाना झालेला दिसत नाही. त्यामुळे आयुष्यभर कष्ट करणे एवढेच त्यांच्या नशिबी उरते. दलित समाजात ज्यांना राजकारणात संधी मिळाली त्यांनी स्वत:चा फायदा करून घेतलेला दिसतो. बाकीचा दलित समाज फक्त राजकीय दबावाखाली जगत असलेले चित्र दिसते. दलितांचा वापर राजकारणासाठी झाला. बाकीचा दलित समाज दारिद्र्यात जीवन जगत असलेला जाणवते.

गावातील सत्ताप्रमुखांची मुले संपत्तीच्या जोरावर स्वैर वागू लागली. त्यांच्यात व्यसनाधिनता वाढली. स्त्रीलंपट झाली. त्यामुळे गावातील तरुण मुलींच्या असुरक्षिततेची भिती निर्माण झाली. पैसा खर्च करण्याचे नवे मार्ग त्यांनी शोधून काढले. सर्व स्तरातील माणसांच्या जीवनात अशा अनेक समस्या निर्माण झालेल्या दिसतात.

## ग्रामीण वातावरण :

ग्रामीण वातावरण हे "खांदेपालट" कादंबरीतील उपआशायसूत्र आहे. हे ग्रामीण वातावरण कादंबरीचे कथानक व व्यक्तिदर्शन यातील रहस्य उलघडण्यास उपकारक ठरलेले आहे. "खांदेपालट" कादंबरीतील वातावरण ग्रामीण आहे. इरिगेशनमुळे परंपरागत खेड्याचा चेअरा बदललेला जाणवतो. बागायती शेतीमुळे उत्पादनात वाढ होते. शेतक-यांना पैसा मिळू लागतो. त्या पैशाच्या जोरावर गावच्या राजकारणाचे चित्र बदललेले दिसते. या बदलत्या वातावरणात विविध स्वभावाची माणस कशी बदलत गेलेली आहेत हे जाणवते.

खेडेगावातील बदलत्या राजकारणाला उठावदारपणा आणण्यासाठी तेथील वातावरण हा घटक महत्वाचा ठरला आहे. किंबहूना ग्रामीण वातावरण हा घटक या कादंबरीत ठळकपणे जाणवतो. आकरा एकराचा मळा, ऊसाचे पिक केळीची बाग, नानांची वडिलार्जीत जूनी विहिर या तपशिलातून नाना बडे बागायतदार कसे आहेत हे दाखविले आहे.

हायवेशेजारी असलेले गाव, माळरानावर साखरकारखाना गावात जैनाचे उंच मंदिर, गावाची वेश, वेशीत भरणारा वैरणबाजार ग्रामपंचायतीत असणारा टी.व्ही. विजेचे लुकलुकणारे दिवे अशा तपशिलातून या कादंबरीत ग्रामीण जीवनातील वास्तवता स्पष्ट झालेली दिसते. राजीच्या मृत्यूचा प्रसंग या वातावरणामुळे जीवंत साकार झालेला दिसतो. "सायंकाळी नाना मळयात जातात. राजीवर बलात्कार करतात. अंधार वाढत जातो. काळोख्याचे पाश आवळत जातात तसे राजीच्या शरीराभोवती वासनेचे आणि मृत्यूचे पाश आवळत जातात. हा प्रसंग ग्रामीण वातावरण निर्मितीमुळे जीवंत साकार झालेला जाणवतो.

राजीच्या मृत्यूविषयी चर्चा बोलकी आहे. ग्रामीण भागात सामान्य माणसांच्या प्रतिक्रिया तर्कवितर्क कसे बदलत जातात यातील अनेक बारकावे लेखकाने

टिपलेले आहेत. या प्रसंगातून ग्रामीण वातावरणात वागणाऱ्या लोकांच्या जीवनाची विविधता दिसते. ग्रामीण वातावरणातील नानांच्या ऐश्वर्यसंपन्न घराचे वर्णन करताना लेखक म्हणतात,

"अंगणात सिताफळाच्या झाडावर पिवळधमक उनं पडलेलं. त्या गोजऱ्या उनात चिमण्यांचा कलकलाट चाललेला. अंगणात मध्यभागी बांधलेला कांक्रीटचा मोठा हौद....., दारातून वाकून नानाचा थोरला बैल बाहेर आला. कासरा ढिला सोडून तोंडानं शिळ घालीत तो पाणी पाजू लागला. उभ्या उभ्या हौदात तोंड घालून फुस्स... फुस्स... असा आवाज काढीत गळ्याखाली पोळीतून पाणघोटाच्या गुडगुड लाटा ढकलीत बैल पाणी पिऊ लागले."
( खांदेपालट, पृ. ७१).

या वातावरणातून ग्रामीण जीवनाचे वास्तव दर्शन घडते. अशा अनेक तपशिलातून ग्रामीण वातावरण साकार झालेले जाणवते. ग्रामीण जीवन या वातावरणाशी एकजीव झालेले आहे. या वातावरणातच धोंडीनानासारखी बेरकी माणसं पोसलेली दिसतात.

मराठी कादंबरीतील पारंपरिक वातावरणापेक्षा "खांदेपालट" कादंबरीतील वातावरण वेगळी स्वरूप घेऊन आलेले जाणवते. वातावरण हे या कादंबरीतील एक आशयसूत्र झाले आहे. ग्रामीण वातावरणामुळे कादंबरीतील अनेक घटना व प्रसंग जीवंत साकार झालेले जाणवते.

८) समारोप :

"खांदेपालट" कादंबरीत ग्रामीण भागातील बदलते ग्रामीण राजकारण हे मुख्य आशयसूत्र आहे. या आशयसूत्राला बळकटी आणण्यासाठी या कादंबरीत आशयसूत्राचे अनेक पदर विस्तृतपणे प्रकट झाले आहेत. या आशयसूत्रातून बदलत्या राजकीय वातावरणामुळे ग्रामीण जीवनात विविध स्तर निर्माण झालेले

दिसतात. जीवनातील या विविधतेतून ग्रामीण जीवनात अनेक नव्या समस्या निर्माण झालेल्या जाणवतात.

गावातील सत्तेचे केंद्रिकरण सहकारातील प्रमुख माणसाकडे गेलेले दिसतात. ग्रामीण जीवनात सत्तेचे केंद्रस्थान बदलल्यामुळे ग्रामीण जीवनाचे बलस्थानही बदलले आहे. सत्ता, संपत्ती, आणि शक्ती यांच्या जोरावर गावातील सत्ता-प्रमुखानी स्वत:च फायदा करून घेतला. आपले राजकीय आसन स्थिर करण्यासाठी गावातील माणसांच्या जीवनाशी खेळ सुरु झाला. सत्ताप्रमुख गावात अनेक भानगडी करून लागला. त्याचा परिणाम ग्रामीण जीवन अस्थिर झाले. सामान्य लोकांच्या जीवनात अनेक अडचणी निर्माण होऊ लागल्या. त्यांची सतत पिळवणूक होऊ लागली. त्यांचे विविध स्वरूपात शोषण होऊ लागले. गावातील सत्ताप्रमुख दुटप्पी वागू लागला. त्यामुळे अशा माणसांच्या जगण्याला दुभंगलेपणा आले. त्यांच्या खलप्रवृत्ती वागण्यामुळे त्यांच्या जीवनात अस्थिरता निर्माण झालेली दिसते. त्यांनी मिळविलेल्या संपत्तीचा उपभोग त्यांची मुले वेगळया पध्दतीने घेऊ लागतात. व्यसनाधिनता वाढत जाते. स्त्रीलंपट बनतात. चैन करतात. मुलांच्या अशा वागण्याचा परिणाम सत्ताप्रमुखाच्या जीवनावर होतो. त्यांची उमेद खचत जाते. आपले दिवस आता पालटणार याची जाणीव त्यांना होते. यामुळे त्यांचे दुभंगलेपण अधिकच वाढत जाते.

सामान्य शेतकऱ्यांच्या जीवनात निराशा वाढलेली जाणवते. राजकारणामुळे समाजात दुफळी निर्माण होते. जातीजातीत वैर निर्माण होते. माणसातील माणूसपण हरवत चाललेले चित्र दिसू लागते. पिढयानपिढयाचे वैरत्व निर्माण झालेले दिसते. बदलत्या राजकारणात काही माणसांना महत्व प्राप्त झालेले दिसून येते. लोकशाही प्रक्रियेमुळे दलितांना सत्तेत सहभागी होण्याची संधी मिळाली. ज्याना संधी मिळाली त्यांनी आपले उखळ पांढरे करून घेतले. बाकीच्या दलित समाजाचा वापर केवळ राजकारणासाठी झालेला दिसतो.

गावगाडयात ज्याच्याजवळ बेरकीपणा होता, मग्रूरी होती त्यांनी आपले वर्चस्व प्रस्थापित केलेले दिसते. सामान्य माणसांच्या जगण्याची सतत परवड होत राहिलेली जाणवते.

"खांदेपालट" कादंबरीच्या आशयसूत्रांचा अभ्यास करताना बदलत्या राजकारणाचा माणसांच्या जीवनावर परिणाम झालेला जाणवतो. या परिणामामुळे मानवी जीवनात विविधता आलेली दिसते. ग्रामीण जीवनात नवे संघर्ष निर्माण होतात. या संघर्षांना तोंड देताना त्यांच्या भावनांचा सतत कोंडमारा होत असल्याचे जाणवते.

......

## प्रकरण दुसरे

## संदर्भसूची


| | | |
|---|---|---|
| १. | बांदिवडेकर, चंद्रकांत | - "मराठी कादंबरीचा इतिहास", पुणे मेहता प्रकाशन, तृ. आ. १९७३, पृ. १२. |
| २. | तत्रैव, पृ. १२ | |
| ३. | तत्रैव, पृ. ४ | |
| ४. | आत्रे, त्रिंबक नारायण | - "गांव-गाडा", मुंबई, ह.वि.मोटे प्रकाशन, तृ.आ. १९५९, पृ. १२०. |
| ५. | यादव, आनंद | - "ग्रामीणता साहित्य आणि वास्तव", मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्र.आ. १९८१, पृ. ३५. |
| ६. | पाटील, मोहन | - "लिगाड आणि खांदेपालट", मौज प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती १९९१, पृ. ५. |


......